# जाहिर सूचना

महा.राज्य.वि.वि.कं. मर्या अचलपूर विभागांतर्गत सत्र 2026-2027 करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची आहे.

**विजतंत्री (Electrician) - 32, तारतंत्री (Lineman) -30 व कोपा-पासा 11 एकूण- 73**

**शैक्षणीक अर्हता :- (1)** म.राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ 10+2 बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यकः (2) महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मधील बेस्ट 5 चे गुण ग्राह्य धरले जाणार नाहीत. (3) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री, तारतंत्री व कोपा-पासा व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ MSBTE या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रिशन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामुळे विजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार सुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येईल. **अटी व शर्ती :- (1)** उमेदवाराचे वय 18 वर्षे पुर्ण असणे आवश्यक व कमाल 30 वर्ष असावे तसेच राखीव उमेदवाराकरीता वयाची अट 05 वर्ष शिथिलक्षम राहील. त्याकरीता उमेदवाराने राखीव गटातील जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (2) सदर उमेदवार हा अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असणे आवश्यक असुन, ईतर जिल्हातील उमेदवाराचा विचार केल्या जाणार नाही. (आधारकार्ड मधील पत्त्यानुसार) (3) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतांना सर्वसत्राची व एकत्रीत गुणपत्रीका (ITI), राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र, माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परीक्षा-गुणपत्रक प्रमाणपत्र (S.S.C.) आधारकार्ड, सादर (Upload), करावे. अन्यथा अपुर्ण व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर न केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (4). उमेदवाराने नित्य वापरात असलेला ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रंमाक योग्य व अचूक नमुद करावा. (5) प्रशिक्षणाचा कालावधी 1 वर्षे राहिल (6) ईच्छुक व पात्र उमेदवारांनी **www.apprenticeshipindia.org** या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासुन ते **दि. 16.02.2026** पर्यंत या कार्यालयाचा आस्थापना क्रमांक **E10162701548** यावर योग्य व पुरीपुर्ण माहितीसह सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही (7) ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत शैक्षणिक मुळ कागदपत्रे व आधारकार्ड कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., विभागीय कार्यालय, सिव्हिल लाईन, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती येथे **दि. 17.02.2026 ते दि. 27.02.2026 पर्यंत सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.30 पर्यंत** अर्ज स्वतः सादर करणे आवश्यक. आहे (8) शिकाऊ उमेदवार यांची निवड माध्यमिक शालांत परीक्षेचे 50% गुण व आय.टी.आय. चे 50% गुण असे एकुण गुण विचारात घेवुन गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादी तयार करुन शिकाऊ उमेदवाराची निवड करण्यात येईल (9) जाहिरातीमध्ये अंशतः बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे व प्रशिक्षणाकरीता जागा नियमाचे अधिन राहुन कमी जास्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहील.

**कार्यकारी अभियंता,**

**म.रा.वि.वि.कं. मर्या. अचलपूर विभाग**

**PRO No. 25**